सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे ४११ ००७


संदर्भ क्र. विविमं/२०२३–२४/०७७ **अत्यंत महत्त्वाचे व कालमर्यादेचे** दिनांक : ०६/०९/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित पुणे जिल्ह्यांतील सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : पुणे जिल्हयातील एकाच दिवशी सर्व महाविद्यालयामध्ये दिनांक १४ सप्टेंबर २०२३ रोजी विशेष नवमतदार नोंदणी अभियानाचे आयोजन करणेबाबत..**

**संदर्भ : क्र उभसंक्र–१३/आस्था–१/अ.शा.क्र/१३/२०२३ पुणे दिनांक ०४ सप्टेंबर, २०२३ चे प्रत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदभीर्य पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते कि, पुणे जिल्हयात प्रारूप मतदार यादी प्रसिध्दीच्या अनुषंगाने मा. भारत निवडणूक आयोग यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमामध्ये मा. मुख्य निवडणूक आयुक्त व मा. निवडणुक आयुक्त भारत निवडणुक आयोग यांनी पुणे जिल्हयाच्या छायाचित्रासह मतदार यादीचा आढावा घेतला असता एकुण मतदार संख्येच्या तुलनेत नव युवा मतदारांची नोंदणी वाढविण्याची आवश्यकता असल्याचे सूचित केले आहे. या अनुषंगाने **दि. १४/०९/२०२३** या दिवशी राबविल्या जाणाऱ्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत पुणे जिल्हयामध्ये नवमतदारांची नोंदणी वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणेच्या सूचना दिल्या आहेत.

पुणे जिल्हयातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. सदर महाविद्यालयामध्ये मोठया प्रमाणावर विद्यार्थी संख्या असुन त्यांची १००% मतदार नोंदणी होणे आवश्यक आहे. आपले महाविद्यालयातील प्रत्येक पात्र विद्यार्थ्यांची नोंद मतदार यादीमध्ये व्हावी यासाठी मा. जिल्हाधिकारी, पुणे तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांनी महाविद्यालयांमध्ये मतदार नोंदणी अभियान राबविण्याचे ठरविले आहे. **सदर अभियानाचे अंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) व इतर कर्मचारी दि. १४/०९/२०२३ रोजी आपल्या महाविद्यालयांना भेटी देणार आहेत. यावेळी आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेतील/विभागातील सर्व पात्र विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी करण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.**

सदर नवमतदार नोंदणी अर्ज हे ऑनलाईन स्वरूपात देखील भरता येत असुन हे अर्ज http://voters.eci.gov.in या लिंक वरून भरता येतात. तसेच Voter Search Helpline App द्वारे ही भरता येतात. सदर ॲप हे मोबाईलवर Playstore वरून डाउनलोड करता येते.

या संबंधीचे सविस्तर पत्र, आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. सदरचे पत्र आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचनाफलकांवर तसेच जिथे विद्यार्थी एकत्र येत असतात (उदा.ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह/उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनीय भागात प्रदर्शित करून सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून ही माहिती सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याबाबत आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

शासन निर्देशानुसार विशेष नवमतदार नोंदणी अभियान हा उपक्रम विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, याचबरोबर आपल्या महाविद्यालयातील ELC नोडल अधिकारी व ॲम्बेसेडर, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून यशस्वी करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

या अभियानांतर्गत आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागात नवमतदार नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती शासनास एकत्रित सादर करावयाची असल्याने नवमतदार नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती (नाव, जन्म दिनांक, लिंग) ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर **(www.unipune.ac.in- BOD - BOD online - Login - college Login (Enter Username & Password) - Important Links -** विशेष नवमतदार नोंदणी अभियान अहवाल) या लिंकवर तात्काळ भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे. कळावे, ही विनंती

सोबत : वरीलप्रमाणे.

संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

महाराष्ट्र शासन

**डॉ. राजेश देशमुख**
भा.प्र.से.
जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, पुणे

दुरध्वनी: (कार्यालय): ०२० २६११४९४९
(निवास) : ०२० २६३६१८१८

जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, पुणे
११, फायनान्स रोड, पुणे – ४११ ००१.

क्रमांक : क्र.३५/संक्र-७३/आस्था-१/अ.शा.क्र/१४/2023
पुणे, दिनांक : ०४/०८/2023

प्रति,
सर्व नोंदणीकृत महाविदयालय व संस्था

विषय :- दि ०१-०१-२०२४ या अर्हता दिनांकावर छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम
पुणे जिल्ह्यातील एकाच दिवशी सर्व महाविद्यालयामध्ये दिनांक -१४ सप्टेंबर २०२३ विशेष नवमतदार नोंदणी अभियानाचे आयोजन करणेबाबत

मा.महोदय/ महोदया

मा. भारत निवडणुक आयोगाने दिनांक ०१-०१-२०२४ या अर्हता दिनांकावर छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहिर केलेला आहे सदर पुनरिक्षण पुर्व उपक्रम आणि पुनरिक्षण कार्यक्रम या दोन भागाचा समावेश आहे. मतदार यादीची गुणवता राखण्यासाठी पुनरिक्षण पुर्व उपक्रम अत्यंत महत्वाचा आहे. सदर कार्यक्रम अंतर्गत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी (Turnout Implementation Plan) अंतर्गत विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. मतदारांचा एकुण सहभाग वाढविण्यासाठी लक्षित प्रयत्नासह विविध माध्यमांद्वारे मतदानाच्या टक्केवारीत लक्षणिय वाढ करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. त्याचा एक भाग म्हणून २१ ऑगस्ट ते ३० नोव्हेंबर २०२३ या कालावधीमध्ये विदयार्थ्यांकडून मतदार नोंदणीचे . मतदार यादीतील नोंदणीच्या दुरूस्ती वा वगळणी इत्यादी बाबत विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम पुणे जिल्हयातील २१ विधानसभा मतदार संघामध्ये राबविण्यात येणार आहे.

पुणे जिल्हयात अंतिम मतदार यादी दिनांक ०५-०१-२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन सदर मतदार यादीत एकुण ७९५१४२० एवढे मतदार समाविष्ट आहेत. पुणे जिल्हयाची एकुण अंदाजित लोकसंख्या १.८ कोटी असुन त्याममध्ये १८-१९ वयोगटातील लोकसंख्या ३,५९,८३९ इतकी आहे आणि १८-१९ वयोगटातील मतदार संख्या ६५८५१ इतकी आहे. म्हणजेच २९३९८८ एवढे व्यक्ती हया मतदार होणेस पात्र होऊ शकतात. तसेच पुणे शहरामध्ये राज्याच्या विविध भागातून विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येतात ते शिक्षणासाठी पुण्यामध्ये ३ ते ५ वर्ष वास्तव्य करतात त्यामुळे या मुलांची मतदार नोंदणी पुण्यामध्ये किंवा त्यांच्या मूळगावी होणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा व्यक्ती पर्यंत पोहचणे हे निवडणूक विभागाचे कर्तव्य आहे.

पुणे जिल्हयात प्रारूप मतदार यादी प्रसिध्दीच्या अनुषंगाने मा. भारत निवडणुक आयोग यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमामध्ये मा.मुख्य निवडणुक आयुक्त व मा. निवडणुक आयुक्त भारत निवडणुक आयोग यांनी पुणे जिल्हयाच्या छायाचित्रासह मतदार यादीचा आढावा घेतला असता एकुण मतदार संख्येच्या तुलनेत नव युवा मतदारांची नोंदणी वाढविण्याची आवश्यकता असल्याचे सूचित केले आहे.याअनुषंगाने दिनांक १४/०९/२०२३ या दिवशी राबविल्या जाणा-या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत पुणे जिल्हयामध्ये नवमतदारांची नोंदणी वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणेच्या सूचना दिल्या आहेत.

मा. भारत निवडणुक आयोगाने लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० मध्ये सुधारणा केली असुन आता वर्षातुन चार वेळा १ जानेवारी , १ एप्रिल , १ जुलै , १ ऑक्टोंबर या अर्हता दिनांकावर मतदार नोंदणी करता येणार आहे. या संधीचा लाभ घेऊन आगामी काळात पुणे जिल्हयातील नविन मतदार नोंदणी प्रोत्साहित करणे यावर भर देण्यात येणार आहे.

दि.३/८/२०२३ रोजी मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी पुणे , उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी , पुणे व उपजिल्हाधिकारी नोडल अधिकारी स्वीप यांनी सर्व ELC नोडल अधिकारी व ॲम्बेसेडर यांची बैठक घेवून सदर उपक्रमाबाबत माहिती दिलेली आहे. तसेच दि. २८-०८-२०२३ रोजी जवळ जवळ १०२ महाविद्यालयातील प्राचार्य यांचेशी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे नव मतदार नोंदणी करणे संदर्भात चर्चा करणेत आली. दि.३१/८/२०२३ रोजी बहुउद्येशीय हॉल येथे मोठया प्रमाणावर महाविद्यालयातील नोडल अधिकारी व प्रत्येकी दोन प्रतिनिधी यांना बोलावून Online नव मतदारांचे फॉर्म भरुन घेणेबाबत ट्रेनिंग देणेत आले जेणेकरुन त्यांनी त्यांचे महाविद्यालीयातील विद्यार्थ्याचे फॉर्म भरुन व Online नव मतदारांचे नोंदणी करणे सुलभ होणेकामी या सभा घेतलेल्या आहे.

पुणे जिल्हयामध्ये साधारण ३५० इतकी महाविद्यालयाची संख्या आहे. सदर महाविद्यालयामध्ये मोठया प्रमाणावर विदयार्थी संख्या असुन त्यांची १००% मतदार नोंदणी होणे आवश्यक आहे. आपले महाविद्यालयातील प्रत्येक पात्र विदयार्थ्यांची नोंद मतदार यादीमध्ये व्हावी यासाठी या कार्यालयाने महाविद्यालयामध्ये मतदार नोंदणी अभियान राबविण्याचे ठरविले आहे. सदर अभियानाचे अंतर्गत या कार्यालयाचे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) व इतर कर्मचारी **दि. - १४/०९/२०२३** रोजी आपले महाविद्यालयामध्ये भेटी देणार आहेत.

सदर अर्ज हे ऑनलाइन स्वरुपात देखील भरता येत असुन हे अर्ज https://voters.eci.gov.in या लिंक वरून भरता येतात. तसेच Voter Search Helpline App दवारे ही भरता येतात. सदर ॲप हे मोबाईलवर Playstore वरुन डाउनलोड करता येते. मतदार नोंदणीसाठी आवश्यक खालीलप्रमाणे अर्ज आहेत. व सदर अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे खालीलप्रमाणे

| अर्ज कशासाठी | अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे |
|---|---|
| मतदार यादीमध्ये नविन नाव नोंदणी<br>**नमुना ६** | रहिवास पुरावा - लाईट बिल/ पाणी पटटी ,आधार कार्ड, बँकेचे किंवा पोस्टाचे पासबुक, भारतीय पारपत्र, नोंदणीकृत विक्रीखत , नोंदणीकृत भाडेकरार<br>वयाचा पुरावा - जन्म प्रमाणपत्र , आधार कार्ड ,राज्यशिक्षण मंडळाने निर्गमित केलेले १० वी किंवा १२ वी चे प्रमाणपत्र |
| मतदार यादीमध्ये नाव वगळणे<br>**नमुना ७** | नाव वगळावयाचे व्यक्तीचा मृत्यू दाखला , लाइट बिल/ पाणी पटटी , आधार कार्ड , बँकेचे किंवा पोस्टाचे पासबुक , भारतीय पारपत्र , नोंदणीकृत विक्रीखत , नोंदणीकृत भाडेकरार |
| मतदार यादीतील / मतदान ( Epic Card) कार्डातील नाव दुरुस्ती<br>**नमुना ८** | रहिवास पुरावा - लाइट बिल/ पाणी पटटी ,आधार कार्ड , बँकेचे किंवा पोस्टाचे पासबुक, भारतीय पारपत्र, नोंदणीकृत विक्रीखत , नोंदणीकृत भाडेकरार,<br>वयाचा पुरावा - जन्म प्रमाणपत्र , आधार कार्ड , राज्यशिक्षण मंडळाने निर्गमित केलेले १० वी किंवा १२ वी चे प्रमाणपत्र |

तरी सदर मोहिमेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य या नात्याने आपली अतिशय महत्वाची भुमिका आहे. आपल्या संस्थेच्या अधिनस्त सर्व महाविद्यालयातील सर्व पात्र विदयार्थ्यांची मतदार नोंदणी करिता आपले स्तरावरुन सर्व विदयार्थ्यांना अवगत करावे. सदर विदयार्थ्यांची माहिती खालील नमून्यामध्ये तयार करुन या कार्यालयास कळवावे.

महाविद्यालयाचे व संस्थेचे नांव

| ७-१८ वयोगटातील विद्यार्थी | १८-१९ वयोगटातील विद्यार्थी | १९-२० वयोगटातील विद्यार्थी | २० च्यापुढील वयोगटातील विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

दिव्यांग व अपंग विद्यार्थ्यांची संख्या

| १७-१८ वयोगटातील विद्यार्थी | १८-१९ वयोगटातील विद्यार्थी | १९-२० वयोगटातील विद्यार्थी | २० च्यापुढील वयोगटातील विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

### एकूण विद्यार्थ्यांपैकी सदर कॅम्पमध्ये नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या

महाविद्यालयाचे व संस्थेचे नांव

| अ क्र | महाविद्यालयांची संख्या | एकूण विद्यार्थी संख्येपैकी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | १७-१८ वयोगटातील विद्यार्थी | | | | १८-१९ वयोगटातील विद्यार्थी | | | |
| | | एकुण | ऑनलाइन भरलेले | ऑफलाइन भरलेले | शिल्लक | एकुण | ऑनलाइन भरलेले | ऑफलाइन भरलेले | शिल्लक |

| अ क्र | महाविद्यालयांची संख्या | एकूण विद्यार्थी संख्येपैकी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | | १९-२० वयोगटातील विद्यार्थी | | | | २० च्यापुढील वयोगटातील विद्यार्थी | | | |
| | | एकुण | ऑनलाइन भरलेले | ऑफलाइन भरलेले | शिल्लक | एकुण | ऑनलाइन भरलेले | ऑफलाइन भरलेले | शिल्लक |

दिव्यांग व अपंग विद्यार्थ्यांची संख्या

| अ क्र | महाविद्यालयांची संख्या | एकूण विद्यार्थी संख्येपैकी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | १७-१८ वयोगटातील विद्यार्थी | | | | १८-१९ वयोगटातील विद्यार्थी | | | |
| | | एकुण | ऑनलाइन भरलेले | ऑफलाइन भरलेले | शिल्लक | एकुण | ऑनलाइन भरलेले | ऑफलाइन भरलेले | शिल्लक |

| अ क्र | महाविद्यालयांची संख्या | एकूण विद्यार्थी संख्येपैकी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | | १९-२० वयोगटातील विद्यार्थी | | | | २० च्यापुढील वयोगटातील विद्यार्थी | | | |
| | | एकुण | ऑनलाइन भरलेले | ऑफलाइन भरलेले | शिल्लक | एकुण | ऑनलाइन भरलेले | ऑफलाइन भरलेले | शिल्लक |

सदर मोहिमेत भाग घेतलेल्या नोडल विद्यार्थ्यांना व महाविद्यालय यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार असून जास्तीत जास्त नव मतदारांची नोंदणी करणा-या महाविद्यालयाच्या प्राचार्यांचा व सहभागी विद्यार्थ्यांचा २५ जानेवारी २०२४ रोजीच्या राष्ट्रीय मतदार दिवशी गौरव करण्यात येणार आहे. सदर अभियानाचा उद्देश हा आपले महाविद्यालयामध्ये १०० टक्के मतदार नोंदणी हा असून सर्वकष मतदार नोंदणी करणेचा मानस आहे.

मतदार यादी हा लोकशाहीचा पाया असुन ती सशक्त करण्यासाठी मा. भारत निवडणुक आयोगाचा उपरोक्त विशेष अभियान आहे. मतदार यादी शुध्दीकरणासाठी मतदारांमध्ये जनजागृती करुन युवा मतदारांची नोंदणी वाढविणे तसेच मतदार यादी अदयावत करणे हे राष्ट्रीय कर्तव्य असुन सदर कर्तव्यामध्ये आपला बहुमोल सहभाग अपेक्षित आहे. तरी सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आपल्या महाविद्यालयाचा सहभाग व सहकार्य लाभेल अशी मी आशा करतो. तसेच सामान्य प्रशासन विभागाकडील दि.३१ ऑगस्ट २०२३ चे शासन परिपत्रकात उत्कृष्ट मतदार-मित्र महाविद्यालय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे .त्याची प्रत यासोबत जोडली आहे.

आदरपूर्वक

आपला विश्वासु

(डॉ.राजेश देशमुख)
जिल्हाधिकारी , पुणे तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी पुणे

प्रति,

प्राचार्य

-----------------------------

-----------------------------

प्रत :- १. मा. मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य , मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
२.मा.उपजिल्हा निवडणुक अधिकारी, पुणे यांना माहितीस्तव.
३.मतदार नोंदणी अधिकारी १९५ ते २१५ विधानसभा मतदारसंघातील AERO सदर अभियानाचे आयोजनाबाबत अधिनस्त कर्मचारी यांना सूचना देणेत याव्यात व त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी.
४.जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

## मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्र.संकीर्ण २०२३/प्र.क्र.३८९/२३/३३.
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२,
दि. ०१ सप्टेंबर, २०२३.

प्रति,

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व

**विषय :- उत्कृष्ट मतदार-मित्र महाविद्यालय पुरस्कार.**
**संदर्भ :- या कार्यालयाचे समक्रमांकित दि.३१.८.२०२३ रोजीचे परिपत्रक.**

महोदय,

भारत निवडणूक आयोगाने दि. २९.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम, २०२४ घोषित केलेला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत नागरिकांची मतदार नाव नोंदणी करण्यात येते. यानुषंगाने महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालया यांनी मतदार नाव नोंदणी करण्यासंदर्भात केलेल्या उपक्रमांची माहिती मागवून त्यानूसार उत्कृष्ठ काम करणाऱ्या महसूली विभाग निहाय महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांना उत्कृष्ठ मतदार - मित्र महाविद्यालय पुरस्कारासंदर्भात दि.३१.८.२०२३ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे. कृपया सदर परिपत्रक आपल्या जिल्हातील महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयांला निर्गमित करण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(म.ग्र. पारकर )
उप सचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

सोबत :- वरीलप्रमाणे

उत्कृष्ट मतदार-मित्र महाविद्यालय पुरस्कार.

**महाराष्ट्र शासन,**
**सामान्य प्रशासन विभाग**
**परिपत्रक क्र.संकीर्ण २०२३/प्र.क्र.३८९/२३/३३, दि. ३१ ऑगस्ट, २०२३.**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**

**परिपत्रक**

महाविद्यालयांमध्ये तरुण मतदार मोठ्या प्रमाणात शिक्षण घेत आहे. या तरुण मतदाराला देशाच्या, राज्याच्या निर्णयप्रक्रियेत सहभागी करण्याचा पहिला मार्ग म्हणजे त्यांची मतदार यादीत नोंद करणे. तरुण पिढीच्या या सहभागासाठी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने 'उत्कृष्ट मतदार-मित्र महाविद्यालय पुरस्कारा'चे आयोजन केले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, कार्यालयीन कर्मचारी यांनी यासाठी सहकार्य केल्यास आपण आपल्या राज्यातील अठरा वर्षांवरील सर्व तरुण पिढीला निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेऊ शकू, याची खात्री वाटते. सन २०२४ मध्ये येऊ घातलेल्या लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांमध्ये मतदान करण्यासाठी, ०१ जानेवारी २०२४ रोजी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना ३० नोव्हेंबर २०२३ पर्यंत मतदार यादीत आगाऊ नोंदणी करण्याची संधी आहे. ही मतदार यादी २०२४ मधील निवडणुकांसाठी महत्त्वपूर्ण असणार आहे.

या पुरस्कारासाठी नामांकन पाठवताना महाविद्यालयांनी गूगल फॉर्ममधील पुढील प्रश्न भरून पाठवायचे आहेत:-

१. महाविद्यालयातील एकूण विद्यार्थ्यांची संख्या
२. ०१ जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयातील १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या
३. महाविद्यालयातील मतदार नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या
४. महाविद्यालयातील मतदार नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची टक्केवारी
५. मतदार जागृतीसाठी महाविद्यालयाने राबवलेले उपक्रम
६. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरांतर्गत मतदार जागृतीसाठी राबवलेले उपक्रम

महाविद्यालयांनी जवळच्या मतदार नोंदणी कार्यालयाचे सहकार्य घेऊन मतदार नोंदणीची शिबिरे राबवावीत किंवा 'Voter Helpline' या मोबाइल अॅपवरून अथवा Voters Service Portal वरून विद्यार्थ्यांची ऑनलाइन मतदार नोंदणी करून घ्यावी. संदर पुरस्कारासाठी १५ डिसेंबर २०२३ पर्यंत गूगल अर्ज भरून पाठवावा. या पुरस्काराचे वितरण २५ जानेवारी २०२४ रोजी मान्यवर व्यक्तीच्या हस्ते केले जाणार आहे. या पुरस्कारासाठी महाराष्ट्राच्या सहा महसूल विभागांतर्गत सहा महाविद्यालयांची निवड केली जाईल. अधिक माहितीसाठी democracybook2022@gmail.com या मेल आयडीवर संपर्क साधावा.

मतदार नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे आणि माहिती –

१. निवासाचा पुरावा
२. वयाचा पुरावा
३. पासपोर्ट आकाराचा फोटो
४. कुटुंबातील एखाद्याचा किंवा शेजारच्याचा मतदार ओळखपत्र क्रमांक

गूगल अर्जाचा दुवा - https://forms.gle/62YsA6SA3ngZn4UaA

या गूगल अर्जाची हायपर लिंक (क्लिकेबल) असलेली पीडीएफ https://ceoelection.maharashtra.gov.in/ceo/ या संकेतस्थळावर More - Download - SVEEP Circular येथे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(म. रा. पारकर)
उप सचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

प्रत -

१. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, (सर्व).